क्र. एलएनडी ३६८७/१०७५८/सीआर-२८६६/ग-५.

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २४ जुलै, १९८७.

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
वाढवली स.नं. १०४ पैकी ता. कुर्ला
बृहन्मुंबई महानगरपालिकेस रस्त्यासाठी
देण्याबाबत-

ज्ञापन:

अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या पत्र क्र. सी/कार्यासन-१/जमीन-१४/सीआर ११५२, दिनांक ६.८.१९८६ ला अनुलक्षून कुर्ला तालुक्यातील वाढवली या गावातील स.नं. १०४ पैकी १०१२.५० चौ.मी. जमिनीचा आगाऊ ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेस नियोजित रस्त्यासाठी देण्यास शासनाने मंजुरी दिल्याचे कळविण्याचा मला निदेश देण्यात आला आहे.

२. जमिनीचा आगाऊ ताबा खालील अटींना व शर्तींना अधीन राहून देण्यांत यावा.

१] बृहन्मुंबई महानगरपालिकेने रस्त्यासाठी दिलेल्या जमिनीचा त्याच कारणासाठी उपयोग करावा.

२] जमिनीची जो कब्जेहक्काची रक्कम शासनाकडून आकारण्यांत येईल ती व कब्जेहक्काच्या किंमतीवर जमिनीचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून कब्जेहक्काची पूर्ण किंमत भरेपर्यन्त दरसाल विहित दराने व्याज बृहन्मुंबई महानगरपालिकेने भरावे.

३] वरील अटी व याबाबतचे अंतिम आदेश काढतांना शासन व जिल्हाधिकारी घालतील त्या अटी मान्य असल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने लेखी कबुलायत द्यावी.

३. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वरील अट क्र.[३] मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्टॅम्प पेपरवर कबुलायत घ्यावी व तद्नंतर महानगरपालिकेस जमिनीचा ताबा द्यावा. प्रत्यक्ष ताबा दिल्याचा दिनांक शासनास कळवावा.

४. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणी प्रारूप विकास योजना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकाला बाजार भावाची जो किंमत असेल त्याप्रमाणे

क्रमशः/-

उपरोक्त जमिनीचे मूल्य, मुल्य निर्धारण विभागाकडून निर्धारित करुन घेऊन शासनास कळवावे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिलेल्या जमिनीच्या कब्जेहक्काची किंमतही शासनास कळवावी.

५. हे ज्ञापन नगर विकास विभागाच्या सहमतीने व या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन [पहा-शासन निर्णय, वित्त विभाग क्र. ओडीओ-१३७७/१६८-७७/डेक्सपी-९, दि. २०-७-१९७७] काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

कृ.रा.मांडवीकर

[कृ. रा. मांडवीकर]

कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग.

प्रति,

अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई [कागदपत्रांसह]

प्रत रवाना :

आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई [यांचेकडे त्यांच्या दिनांक २५. ३. १९८७ च्या पत्र क्र. आरवी/डेस्क-२/एलएनडो[१]२८६१ ला अनुलक्षून.]

जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे

संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे,

जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर

सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई उपनगर

तहसिलदार, कुर्ला, मुंबई उपनगर.

महालेखापाल [लेखा] महाराष्ट्र १, मुंबई

महालेखापाल [लेखा परीक्षा]१, महाराष्ट्र १, मुंबई,

नगर विकास विभाग,

वित्त विभाग [व्यय ९]

कार्यासन ग५, महसूल व वन विभाग [निवड फाईल].

Scanned by CamScanner

क्रमांक :- सी/कार्यासन-१/[illegible]-१०/सीआरर-११५२ 149

अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई उपनगर जिल्हा, दुसरा मजला,
जुने जकात घर, मुंबई ४०० ०२३
दिनांक : २५.२.८८

वाचा :- शासन, महसूल व वन विभागाचे ज्ञापन क्रमांक एलएनडी-३६८७-१०७५८-सीआरर-२८६६-ग-५ दिनांक २७.७.१९८७.

:- आदेश -:

मौजे वाढवलो तालुका कुर्ला मुंबई उपनगर जिल्हा येथील सर्वे नंबर १०४ पैकी १०१२.५० चौ.मी. या शासनाच्या जमिनीवर बृहन्मुंबई महानगर पालिकेस नियोजित रस्त्यासाठी आगाऊ ताबा देण्यासंदर्भात बृहन्मुंबई महानगर पालिकेने खालील अटी मान्य असल्याबाबत हमीपत्र दिले असल्याने संदर्भाधिन जमिनीचा आगाऊ ताबा बृहन्मुंबई महानगर पालिकेस देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

१] बृहन्मुंबई महानगर पालिका रस्त्यासाठी दिलेल्या जमिनीचा त्याच कारणासाठी उपयोग करील.

२] जमिनीची जी कब्जेहक्काची रक्कम शासनाकडून आकारण्यात येईल ती व कब्जेहक्काच्या किंमतीवर जमिनीचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून कब्जेहक्काची पूर्ण किंमत भरेपर्यंन्त दरसाल विहित दराने व्याज बृहन्मुंबई महानगर पालिका भरेल.

३] वरील अटी व या बाबतचे अंतिम आदेश काढताना शासन व जिल्हाधिकारी घालतील त्या अटी बृहन्मुंबई महानगर पालिकेस मान्य असतील.

स्थळप्रतीवर अप्पर जिल्हाधिकारी यांची सही आहे

अप्पर जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
कार्यकारी अभियंता [ विकास आराखडा ]
बृहन्मुंबई महानगर पालिका, मुख्य कार्यालये,
विस्तारित इमारत, ४ था मजला, फोर्ट,
मुंबई ४०० ००१

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, जमिनीचा आगाऊ ताबा घेण्याकामी जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई यांजकडे संपर्क साधावा.

प्रतिलिपी :- जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख, यांजकडे त्यांचे पत्र क्र. भूप्रदान मोरनं-१८७-८६ दि. १७.२.८६स अनुसरून रवाना.

२/- त्यांनी केलेल्या मोजणीनुसार येणारे क्षेत्र १०१२.५० चौ.मी. जमिनीचा आगाऊ ताबा बृहन्मुंबई महानगर पालिकेस देऊन ताबा पावती व नकाशाच्या

Scanned by CamScanner

चार प्रतींसह अहवाल सादर करावा. त्याचप्रमाणे ताबा पावती व नकाशाची प्रत तहसिलदार कुर्ला व नगर भूमापन क्रमांक ८ यांजकडे माहितीसाठी पाठवावी.

प्रतिलिपी :- तहसिलदार कुर्ला व नगर भूमापन अधिकारी क्र. ८ यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतिलिपी :- मा. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे अवलोकनार्थ सादर.

स्थळप्रतीवर अपर जिल्हाधिकारी
यांची सही असे

अप्पर जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता

मंनाक-

Scanned by CamScanner